**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यात संवाद
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरुन मन की बात द्वारे सर्वसामान्यांशी संवाद साधणार
- गाझामध्ये, इस्रायली हवाई हल्ल्यात किमान ४९ जण ठार
- पाकिस्तानच्या खैबर पख्तुंख्वा भागात झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे १६ जवान ठार

**आणि**

- महिलांच्या टी २० क्रिकेट मालिकेत भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा इंग्लंडचा निर्णय

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात असणारे भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज संवाद साधला. 'तू भारतापासून खूप दूर असलास तरी भारतीयांच्या जवळ, त्यांच्या हृदयात आहेस. तुझ्या प्रवासानं नव्या युगाचा शुभारंभ केला आहे,' अशा शब्दात प्रधानमंत्री मोदी यांनी शुभांशु यांचं कौतुक केलं आणि त्यांना त्यांच्या मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या. ऐकूया दोघांमधल्या संवादाची एक झलक..

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

भारताचं प्रतिनिधीत्व करताना आपल्याला अभिमान वाटत असल्याची भावना शुभांशु यांनी व्यक्त केली. मी कधी अंतराळवीर होईन, असं मला वाटलं

नव्हतं असं सांगत शुक्ला यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीयांना त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या अनेक संधी मिळत आहेत.

ॲक्सिओम ४ मोहिमेअंतर्गत बुधवारी अमेरिकेतल्या फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरमधून अवकाशात पाठवण्यात आलेल्या यानातल्या चमूत शुक्ला यांचा समावेश आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२३ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><><>**

संविधानाची उद्देशिका हा संविधानाचा प्राण असतो आणि म्हणून त्यात बदल होत नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज ते एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. भारताचा अपवाद वगळता जगातल्या कोणत्याही देशाच्या संविधानात बदल करण्यात आलेला नाही अशी टिप्पणी त्यांनी केली. आणीबाणीच्या काळात समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि एकात्मता हे शब्द घातल्याने संविधानकर्त्यांच्या धारणांशी प्रतारणा झाली आहे असं ते म्हणाले.

**<><><><>**

बिहार मध्ये आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रथमच मोबाइल ॲप च्या माध्यमातून नागरिक ई मतदान झाले. अशा प्रकारे निवडणुकीत मतदानासाठी मोबाइल ॲपचा वापर करणारे बिहार हे देशातले पहिलेच राज्य ठरले आहे. बिहार मधे ६ नगर पंचायत आणि ३६ नगर पालिकांमध्ये आज मतदान झालं. यामध्ये प्रथमच मोबाइल द्वारे ई मतदान करण्यासाठी ४० हजार नागरिकांनी

अर्जाद्वारे निवडणूक आयोगाकडे नाव नोंदणी केली आहे. बिहारसाठी आजचा दिवस ऐतिहासिक असल्याच राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी म्हंटल आहे. या मोबाइल ॲप द्वारे मतदानाचा हक्क बजावण्याचा फायदा नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, गंभीर आजाराने ग्रस्त नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना होईल अस प्रसाद यांनी सांगितल. ई मतदानासाठी पुण्यातील सीडॅक संस्थेने सर्व सुरक्षा व्यवस्था असलेल्या आणि व्ही व्ही पॅट ची सुविधा असलेल्या दोन मोबाइल ॲपच्या यंत्रणा विकसित केल्याचही दीपक प्रसाद यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदार याद्या तपासण्यासाठी विशेष प्रखर पुनर्विलोकन प्रक्रीया सुरू केली आहे. प्रत्येक मतदाराची पात्रता पडताळण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना यात सहभागी करुन घेण्यात आलं आहे, अशी माहिती आयोगानं आज दिली. नवीन मतदान केंद्रांसाठी सुमारे २० हजार ६०३ अतिरिक्त बूथ स्तरावरील अधिकारी आणि विद्यमान ७७ हजार ८०० हून अधिक अधिकारी यासाठी नियुक्त केले आहेत. पुनर्विलोकन दरम्यान एक लाखाहून अधिक स्वयंसेवक खऱ्या मतदारांना, विशेषतः वृद्ध, आजारी, अपंग व्यक्ती, गरीब आणि इतर असुरक्षित व्यक्तिंना मदत करतील. निवडणूक आयोगानं नवीन जनगणना फॉर्मची छपाई तसंच बिहारमधल्या २४३ विधानसभा मतदारसंघांमधल्या सात कोटी ८९ लाख मतदारांसाठी घरोघरी वितरण सुरू केलं आहे.

**<><><><><>**

ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत पंजाब मधल्या महिरा इन्फ्राटेक या कंपनीची ५५७ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेत सात स्थावर मालमत्ता आणि मुदत ठेव पावत्या समाविष्ट आहेत. फसवणूक आणि

बनावटीकरणासाठी गुरुग्राम पोलिसांनी कंपनीविरुद्ध नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे संचालनालयाने तपास सुरू केला. बाह्य आणि अंतर्गत विकास कामांसाठी परवाने मिळविण्यासाठी बनावट बँक हमीसह बनावट कागदपत्रे सादर केल्याचा कंपनीवर आरोप आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं गुप्तचर संस्था रॉचे पुढील सचिव म्हणून ज्येष्ठ आयपीएस अधिकारी पराग जैन यांची नियुक्ती केली आहे. जैन हे १९८९ च्या बँचच्या पंजाब कॅडरचे आयपीएस अधिकारी असून ते सध्याचे रॉचे प्रमुख सचिव रवि सिन्हा यांच्याकडून पदभार स्विकारतील. मंत्रीगटाच्या नियुक्ती समितीनं त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकन सिनेटनं परदेशात पैसे हस्तांतरण करण्यासाठीचा कर साडे ३ टक्क्यांवरुन १ टक्के केला आहे. त्यामुळं तिथं राहणाऱ्या अनिवासी भारतीयांना मायदेशात कमी शुल्कात पैसे पाठवता येतील. **One Big Beautiful Bill Act** च्या सुधारित मसुद्यात ही तरतूद आहे. रोख रक्कम, मनी ऑर्डर, कॅशियर चेक यासारख्या माध्यमातून निधी हस्तांतर केला तर हे शुल्क द्यावे लागेल. पण बँक खाती आणि अमेरिकेत जारी केलेली डेबिट आणि क्रेडिट कार्डला कुठलेही शुल्क लागणार नाही. येत्या १ जानेवारीपासून हे नवे दर लागू होतील.

**<><><><><>**

गाझामध्ये, इस्रायली हवाई हल्ल्यात किमान ४९ जण ठार झाले आहेत. शिफा हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनुसार, मृतांपैकी १२ जणांनी पॅलेस्टाईन स्टेडियमजवळ आणि आठ जणांनी अपार्टमेंट इमारतींमध्ये आश्रय घेतला होता. २० हून अधिक मृतदेह नासेर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहेत. हिंसाचार वाढत असताना, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, एका आठवड्यात युद्धबंदी करार

होऊ शकतो. इस्रायली धोरणात्मक व्यवहार मंत्री रॉन डर्मर चर्चेसाठी वॉशिंग्टनमध्ये येण्याची अपेक्षा आहे. ऑक्टोबर २०२३ च्या हल्ल्यापासून हमासने सुमारे ५० ओलिसांना अजूनही ताब्यात ठेवलं आहे. काल रात्री उशिरापासून आज सकाळपर्यंत हल्ले सुरू आहेत.

**<><><><>**

पाकिस्तानच्या ईशान्येकडील खैबर पख्तुंख्वा भागात आज झालेल्या एका आत्मघातकी हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे १६ जवान ठार झाले. या हल्ल्यात इतर १० सैनिक आणि १९ नागरिकही जखमी झाल्याची माहिती पाकिस्तानी पोलिसांनी दिली. या हल्ल्यात दोन घरांची छतंही कोसळली. पाकिस्तानच्या ईशान्येकडील भागात लष्कराचा ताफा जात असतांना एका आत्मघातकी हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेले वाहन या ताफ्यात घुसवले आणि हा स्फोट घ़डवला. पाकिस्तानी तालिबानींच्या हाफिज गुल बहादूर या संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

**<><><><>**

सुदानच्या उत्तरेकडे असलेल्या दारफूर इथं काल रॅपिड सपोर्ट फोर्स - RSF नं केलेल्या गोळीबारात १३ जणांचा मृत्यू झाला तर २१ जण जखमी झाले. जखमींमध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे. सुदानमध्ये एप्रिल २०२३ पासून सुरू असलेल्या गृहकलहात हजारो नागरिक ठार झाले तर लाखोजण शेजारील देशांमध्ये स्थलांतरीत झाले आहेत.

**<><><><>**

भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला हा पहिला सामना टेंट ब्रिज नॉटिंग हॅम इथं सुरू झाला. शफाली वर्मा आणि स्मृती मंधना सलामीला उतरल्या होत्या पण २० धावा काढून शफाली बाद झाली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १३ षटकांत १ बाद १३६ धावा झाल्या आहेत.

**//<><><><><>//**